**साहित्य निर्मितीमध्ये मोलाचे कार्य करणाऱ्या प्रकाशन संस्थेस श्री.पु.भागवत पुरस्कार प्रदान करण्यासाठी निवड समिती.**

# महाराष्ट्र शासन
## मराठी भाषा विभाग

शासन निर्णय क्रमांक-रावापु-१०१२/प्र.क्र.१०३/२०१२/भाषा-३,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
**दिनांक : ३१ ऑगस्ट, २०१२.**

**वाचा :- १) पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, शासन निर्णय क्र.मवापू-२००७/प्र.क्र.३५९/सां.का.३, दिनांक १५ मार्च, २००७.**
**२) पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, शासन निर्णय क्र.पुनाभा-२००८/प्र.क्र.१९६/सां.का.३, दिनांक २५ नोव्हेंबर, २००८.**
**३) पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, शासन निर्णय क्र.श्रीपुभा-शुध्दीपत्रक-२०११/प्र.क्र.१९६/ सां.का.३, दिनांक ३० जुलै, २०११.**

**प्रस्तावना :-**

साहित्य निर्मिती क्षेत्रात लक्षणीय कार्य करणाऱ्या उत्कृष्ट प्रकाशकाला, मराठी प्रकाशन व्यवसायात मोलाचे कार्य करणारे श्री.पु.भागवत यांच्या नावे पुरस्कार देण्याबाबत दिनांक १५ मार्च, २००७ च्या संदर्भ क्रमांक १ च्या शासन निर्णयान्वये आदेश निर्गमित करण्यात आले आहेत. या योजनेअंतर्गत मागील तीन वर्षात उत्कृष्ट प्रकाशकास पुरस्कार देऊन गौरविण्यात आलेले आहे. सदर पुरस्कारासाठी प्रकाशकाची निवड करतांना प्रत्यक्षात प्रकाशन संस्थेच्या या क्षेत्रातील कामगिरी, प्रकाशन संस्थेने कोणकोणत्या स्वरुपाची पुस्तके प्रकाशित केली आहेत याबाबतचा अहवाल, प्रकाशन संस्थेमार्फत प्रकाशित पुस्तकांची साहित्य क्षेत्रातील गुणवत्ता व इतर अनुषंगिक बाबी याचा आढावा घेण्यात येतो. थोडक्यात प्रकाशन संस्थेच्या कामाचे मुल्यमापन करुन पुरस्कार मात्र प्रकाशकाच्या नावे जाहीर करण्यात येतो. ही बाब विचारात घेऊन सदर पुरस्कार प्रकाशकाच्या नावे देण्याऐवजी प्रकाशन संस्थेच्या नावे देण्याबाबतचा निर्णय संदर्भ क्रमांक ३ च्या दिनांक ३० जुलै, २०११ च्या शासन निर्णयान्वये घेण्यात आला.

सदर पुरस्कार यापूर्वी सांस्कृतिक कार्य विभागामार्फत वितरित करण्याची कार्यवाही करण्यात येत होती. सदर विभागामार्फत साहित्य, वाङ्.मय इत्यादी क्षेत्रात भरीव कामगिरी करणाऱ्या मान्यवर व्यक्तींना पुरस्कार देण्याचा विषय हा मराठी भाषा विभागाकडे वर्ग करण्यात आला आहे. त्यामुळे वरील क्षेत्रात लक्षणीय कामगिरी करणाऱ्या मान्यवर व्यक्तिंना देण्यात येणाऱ्या पुरस्काराच्या धर्तीवर पुस्तक प्रकाशन क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या प्रकाशन संस्थेस या नवनिर्मित विभागातर्फे श्री.पु.भागवत यांच्या नावे पुरस्कार देण्याकरिता निवड समितीची पुनर्रचना करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

राज्य शासनातर्फे देण्यात येणारा वरील पुरस्कार वितरित करण्याची कार्यवाही यापूर्वी सांस्कृतिक कार्य विभागाच्या अधिपत्याखालील संचालक, सांस्कृतिक कार्य संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई

यांच्यामार्फत करण्यात येत होती. मराठी भाषेच्या सर्वांगीण विकासाच्या दृष्टीने महाराष्ट्र राज्याच्या सुवर्ण महोत्सवी वर्षामध्ये मराठी भाषेशी संबंधित सर्व कार्यालये, संस्था व मंडळ एकाच विभागाच्या कार्यक्षेत्राखाली आणण्याकरिता सामान्य प्रशासन विभागाच्या दिनांक २९ नोव्हेंबर, २०१० च्या अधिसूचनेन्वये स्वतंत्र मराठी भाषा विभागाची स्थापना करण्यात आली आहे. त्यामुळे साहित्य क्षेत्राशी संबंधित असलेले १) श्री.पु.भागवत पुरस्कार २) उत्कृष्ट वाङ्.मय निर्मितीस राज्य पुरस्कार व ३) विंदा करंदीकर जीवन गौरव पुरस्कार हे तीनही पुरस्कार सन २०१२-१३ या वित्तीय वर्षापासून मराठी भाषा विभागाच्या अधिपत्याखालील महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळाकडून वितरित केले जाण्यासाठी हा विषय राज्य शासनाने मराठी भाषा विभागाकडे हस्तांतरीत करण्याचा निर्णय घेतलेला आहे.

२. मराठी साहित्य निर्मितीमध्ये लक्षणीय कार्य करणाऱ्या प्रकाशन संस्थेस श्री.पु.भागवत यांच्या नावे पुरस्कार प्रदान करण्यास शासनाच्या संदर्भ क्रमांक २ च्या शासन निर्णयान्वये शासन मान्यता देण्यात आली आहे. या पुरस्काराचे स्वरुप आता रुपये ३,००,०००/- ( रुपये तीन लक्ष मात्र ) रोख, मानचिन्ह व मानपत्र असे आहे.

३. प्रस्तुत विषय हा मराठी भाषा विभागाकडे वर्ग करण्यात आल्यामुळे सदर पुरस्कारासाठी निवड समितीची पुनर्रचना करण्याबाबतचा प्रश्न शासनाच्या विचाराधीन होता. त्यामुळे सदर पुरस्काराच्या निवडीसाठी मा.मुख्यमंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखाली खालीलप्रमाणे समिती गठीत करण्यात येत आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य | - | अध्यक्ष |
| २. | मा.उपमुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य | - | उपाध्यक्ष |
| ३. | सचिव, मराठी भाषा विभाग, मंत्रालय, मुंबई | - | सदस्य |
| ४. | अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई | - | सदस्य |
| ५. | अध्यक्ष, अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळ, मुंबई | - | सदस्य |
| ६. | संचालक, सांस्कृतिक कार्य संचालनालय, मुंबई | - | सदस्य |
| ७. | सचिव, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई | - | सदस्य सचिव |

४. सदर समितीचे सदस्य सचिव हे अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाच्या घटक संस्थांकडून (उदा.मराठवाडा, विदर्भ, पश्चिम महाराष्ट्र इत्यादी) या पुरस्कारासाठी शिफारशी मागवतील. सदर पुरस्कारासाठी प्राप्त झालेल्या शिफारशी तसेच अन्य संस्था व व्यक्ती यांच्याकडून प्राप्त झालेल्या शिफारशी समितीपुढे विचारार्थ ठेवतील व सदर समिती पात्र साहित्य प्रकाशन संस्थेची त्यामधून निवड करील.

५. श्री.पु.भागवत पुरस्कार प्रदान करण्यासाठी साहित्य प्रकाशन क्षेत्रात कामगिरी करणाऱ्या नामवंत प्रकाशन संस्थेची निवड करण्यासाठी खालीलप्रमाणे निकष निश्चित करण्यात येत आहेत.

(१) प्रकाशन संस्था ही किमान २० वर्षे प्रकाशन व्यवसायात कार्यरत असावी.
(२) पुस्तक प्रकाशन विषयात विविधता असावी.
(३) पुरस्कार प्रदानासाठी पहिल्या पिढीच्या प्रकाशन संस्थेस प्राधान्य देण्यात यावे.
(४) ग्रामीण भागातील प्रकाशन संस्थांना प्रोत्साहन देण्यासाठी अशा संस्थांचा देखील पुरस्कारासाठी प्राधान्याने विचार व्हावा.

(५) निवड समितीला निर्णय घेणे सुलभ व्हावे याकरिता निकषातील वैशिष्टयांना प्रत्येकी दहा गुण देण्यात येऊन प्रत्येक मुद्याला मिळालेल्या गुणांची प्रतिशत बेरीज सर्वाधिक ज्या प्रकाशन संस्थेची होईल त्याच प्रकाशन संस्थेचा पुरस्कारासाठी विचार व्हावा.

६. या प्रित्यर्थ होणारा खर्च मागणी क्रमांक.झेडएफ-०२, २२०५, कला व संस्कृती (०१) योजनेतर योजना (०१) (०३) - उत्तम पुस्तकांना उत्तेजन - ५० इतर खर्च (२२०५ ३१९९) या लेखाशीर्षाखाली त्या त्या वर्षी मंजूर होणाऱ्या अनुदानातून भागविण्यात यावा.

७. प्रस्तूत प्रकरणी होणाऱ्या खर्चासाठी सचिव, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई यांना आहरण व संवितरण अधिकारी व नियंत्रक अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे. तसेच त्यांना अथवा त्यांनी प्राधिकृत केलेल्या दुय्यम अधिकाऱ्यास या संबंधीच्या देयकावर स्वाक्षरी करण्यासही या आदेशाव्दारे प्राधिकृत करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(संगणक संकेतांक क्र. २०१२१२१०१८५९४२१४३३)

( ललिता शि. देठे )
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१. मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई,
२. मा.उपमुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई,
३. मा.मंत्री (सांस्कृतिक कार्य) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
४. मा.राज्यमंत्री (सांस्कृतिक कार्य) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
५. प्रबंधक, लोक आयुक्त आणि उप लोक आयुक्त कार्यालय, मुंबई,
६. प्रधान सचिव (सांस्कृतिक कार्य), पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, मंत्रालय, मुंबई,
७. सचिव, मराठी भाषा विभाग, मंत्रालय, मुंबई,
८. अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई
९. अध्यक्ष, अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळ, मुंबई,
१०. महालेखापाल, महाराष्ट्र-१ (लेखापरीक्षा / लेखा व अनुज्ञेयता), मुंबई,
११. महालेखापाल, महाराष्ट्र-२ (लेखापरीक्षा / लेखा व अनुज्ञेयता), नागपूर,
१२. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
१३. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई
१४. महालेखाकार (स्थानिक निकाय लेखापरीक्षा व लेखा), महाराष्ट्र, मुंबई,
१५. वित्त विभाग (व्यय-४ / अर्थसंकल्प-३ / अर्थसंकल्प-१४), मंत्रालय, मुंबई,
१६. नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई,
१७. सचिव, महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळ, मुंबई
१८. संचालक, सांस्कृतिक कार्य संचालनालय, मुंबई,
१९. सहसंचालक, लेखा व कोषागारे संगणक कक्ष, नवीन प्रशासन भवन, ५ वा मजला, मुंबई,
२०. अवर सचिव (अर्थसंकल्प), मराठी भाषा विभाग, मंत्रालय, मुंबई,
२१. **भाषा - ३ (संग्रहार्थ).**